# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

## दिनांक ०२-०३-२०१५ रोजी संपन्न झालेल्या सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त.

सोमवार दिनांक ०२ मार्च २०१५ रोजी (का.प.क्र .३९) मा.महापौर सौ.कला रविनंदन ओझा यांचे अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा मुख्य कार्यालयातील कै.प्रबोधनकार केशव सिताराम ठाकरे सभागृह येथे दुपारी २.१५ वा वंदेमातरम या गिताने सुरू झाली. सभेला मा.अति.आयुक्त श्री.रमेश पवार नगरसचिव, श्री.एम.ए.पठाण व संबधीत अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

१. स.स.श्री.जोशी संजय रामदास
२. स.स. श्री. विजय लक्ष्मण वाघचौरे
३. स.स. श्री. किशोर बाबुराव नागरे
४. स.स.श्री.बन्सी ग्यानु जाधव
५. स.स.श्रीमती सुरे सविता संतोष
६. स.स.श्री.राजगौरव हरीदास वानखेडे
७. स.स.श्रीमती वाघमारे ज्योती रुपचंद
८. स.स.श्रीमती सलामपुरे पुष्पा देविदास
९. स.स.श्री.जाधव ज्ञानोबा पांडुरंग
१०. स.स.श्री.बनकर कृष्णा सांडुजी
११. स.स.श्रीमती वाणी सावित्रीबाई हिरालाल
१२. स.स.श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे
१३. स.स.श्री.बेहडे अशोक किसनराव
१४. स.स.डॉ.खान नुझत तरन्नुम खान उमर
१५. स.स.श्रीमती खील्लारे ज्योती रमेश
१६. स.स.श्री. भुईगळ अमित सुधाकर
१७. स.स.श्रीमती अहिरे संगिता राजु
१८. स.स.श्री.मेघावाले मोहन धन्नुलाल
१९. स.स.श्री.माळवतकर महेश शिवाजीराव
२०. स.स.श्री.अनिल जुगललाल जैस्वाल
२१. स.स.श्री.दहिहंडे मनिष चंद्रकांत
२२. स.स.श्री.चौधरी संजय सांडू
२३. स.स.श्री.शिंदे राजू रामराव
२४. स.स.श्री.कोकाटे काशिनाथ हरिभाऊ
२५. स.स.श्रीमती भाले प्राजक्ता मंगेश

२६. स.स.श्री.खान जहांगिर अब्बास

२७. स.स.श्री.जुबेर गाझी असीर अहमद

२८. स.स.श्री.अब्दुल रऊफ खान महेमूद खान

२९. स.स.श्रीमती राजपूत प्राजक्ता विश्वनाथ

३०. स.स.श्री.जाधव विजेंद्र मुरलीधर

३१. स.स.श्रीमती शिंदे किर्ती महेंद्र

३२. स.स.श्री.अनिल श्रीकिसन मकरिये

३३. स.स.श्री.मीर हिदायत अली मीर बसालत अली

३४. स.स.श्रीमती करीमुन्नीसा बेगम जमीलखान

३५. स.स.श्रीमती फिरदोस फातेमा खान

३६. स.स.श्री.चव्हाण हुशारसिंग मांगेराम

३७. स.स.श्री.गादगे विरभद्र रामलींग

३८. स.स.श्रीमती रेखा अजित जैस्वाल

३९. स.स.श्रीमती सय्यद मेहरुन्निसा खाजा

४०. स.स.डॉ. खान जफर अहेमद

४१. स.स.श्री.शहनवाज खां रहेमान

४२. स.स.श्रीमती रेणुका कृष्णा वाडेकर

४३. स.स.श्रीमती सोनवणे सुनिता सुनिल

४४. स.स.श्री.समीर सुभाष राजुरकर

४५. स.स.श्री. बबन पंडीतराव नरवडे

४६. स.स.श्री. वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंते

४७. स.स.श्री.मधुकर दामोधर सावंत

४८. स.स.श्री. तुपे त्रिंबक गणपतराव

४९. स.स.श्रीमती शोभा पुखराज काळे

५०. स.स.श्री.केनेकर संजय किसनराव

५१. स.स.श्री.कुलकर्णी सुरेंद्र मानीकराव

५२. स.स.श्रीमती निरपगारे पुष्पा कांतीलाल

५३. स.स.श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड

५४. स.स.श्रीमती शिंदे सत्यभामा दामोधर

५५. स.स.श्रीमती गांगवे कौशल्याबाई बन्सीलाल

५६. स.स.श्रीमती घडमोडे सविता भगवान

५७. स.स.श्री.कावडे रवि साहेबराव

५८. स.स.श्री.मुंडे बाळासाहेब दिनकर

५९. स.स.श्री.जायभाये सुर्यकांत सुभानराव

६०. स.स.श्री.भारसाखळे पंकज रामचंद्र

६१. स.स.श्री. सुशिल तुकाराम खेडकर

६२. स.स.श्री.निमंगावकर प्रल्हाद गणपतराव

६३. स.स.श्रीमती सुरडकर साधना गणेश

६४. स.स.श्री.हाळनोर गिरजाराम नानाराव

६५. स.स.श्री.खान अक्रम करीम खान

६६. स.स.श्री.जैन विकास रतनलाल

६७. स.स.श्री.बारवाल गजानन रामकिसन

६८. स.स.श्रीमती सुनिता भारत बरथुने

६९. स.स.श्री.शेख खाजा शरफोद्दीन

७०. स.स.श्री.गायकवाड रावसाहेब धोंडीराम

७१. स.स.श्रीमती वेताळ छाया शाईनाथ

**<u>नामनिर्देशित पालिका सदस्यांची नांवे</u>**

१. स.स.श्री.कुलकर्णी गोपाळ शरदराव

२. श्रीमती पाटील रेखा दिनकरराव

श्री.किशोर नागरे :कॉम्रेड गोविंद पानसरे यांची नुकतीच गोळया घालून काही दिवसापुर्वी हत्या करण्यात आली तसेच जेष्ठ पत्रकार रमेश राऊत यांचा स्वाईन फ्ल्यू आजाराने निधन झाले व जेष्ठ छायाचीत्रकार नरेंद्र लोंढे, व सामाजीक कार्यकर्ते जगन्नाथजी खटोर यांना व स.सदस्य श्री. मालाणी यांच्या काकू पुष्पाताई मालानी यांचे निधन झालेले आहे या सर्वांना सभागृहाच्या वतीने श्रध्दाजंली अर्पण करण्यात यावी.

श्री.समीर राजूरकर :यास अनुमोदन आहे.

मा.महापौर :ठिक आहे सर्वांनी श्रध्दाजंली अर्पण करण्यासाठी उभे रहावे.

या वेळी गोंविद पानसरे , रमेश राऊत, नरेंद्र लोंढे, जगन्नाथ खटोर तसेच पुष्पा मालानी यांचे दु:खद निधन झाल्याने त्यांना सभागृहाच्या वतीने दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दाजंली अर्पण करण्यात आली.

श्री.मीर हिदायत अली : जुन्या शहरात व शहाबाजार वार्डात ६-७ दिवसानंतर पाणी येते.२० दिवसात तीन वेळेस पाणी आले. अशी परीस्थिती का निर्माण झाली.

श्री.गिरजाराम हाळनोर :पाण्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर होत आहे उन्हाळा सुरू होत आहे. पाणीटंचाई निर्माण होऊ नये यासाठी प्रशासनाने काय उपाययोजना केल्या आहेत.

श्री.समीर राजूरकर :चार सर्वसाधारण सभेत पाणीप्रश्नावर नियमीत चर्चा झाली. वृत्तपत्रातही छापून येत आहे. पाणीपुरवठा सुरळीत होणार की नाही एकदाच खुलासा घ्यावा.

श्री.राजू शिंदे :शहरातील नागरीकांना पाणी वाढ ग मांय अशी म्हणण्याची वेळ आली आहे.पुरेशे पाणी देणार की नाही.

श्री.प्रमोद राठोड :गेल्या कित्येक दिवसापासून जवळपास तीन वर्षापासून वार्डातील पाण्याचे लाईनचे काम झाले नाही. समांतर एजन्सीला दिल्या जाणा-या ५.२५ कोटी रक्कमेतून वार्डातील पाणीपुरवठयाची कामे करावी आपण निर्णय घेतला यातून केंव्हा कामे होणार आहे. पाण्याच्या लाईनची कामे तीन वर्षापासून होत नाही व त्यांचे मार्फत वसुली चालूच आहे.

यावेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात स.सदस्य श्री.प्रमोद राठोड, श्री.राजू शिंदे, श्रीमती कमल नरोटे, सौ.सविता सुरे श्री.हुशारसिंग चव्हाण, श्री.महेश माळवतकर, श्री.प्रल्हाद निमगांवकर, श्री.रवि कावडे, श्री.सुरेंद्र कुलकर्णी, श्री.संजय चौधरी, श्री.बाळासाहेब मुंडे, श्रीमती सत्यभामा शिंदे, श्रीमती सविता घडमोडे ई. सदस्य डायस समोर खाली बसून पाण्याची समस्या सोडवावी. पाणीपुरवठयाची कामे व्हावी अशी मागणी करतात.

श्री.किशोर नागरे :पाणी पुरवठयाची कामे होणार होती. सुकाणू समितीमध्ये जे निर्णय घेतले त्यानुसार केंव्हा पाणी पुरवठा संबंधीची कामे सुरू करणार, खुलासा घेण्यात यावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :समांतर कडे दिलेले काम महापालिकेकडे घेतले असे वृत्तपत्रात बातम्या आल्या हे सत्य आहे का? एजन्सी काम करीत नाही ब्लॅकलिस्ट केले का? नागरीकांच्या समस्या सोडविल्या जात नाही ते त्यांचे पाप आपण घेतो.पाणीपुरवठयाची कामे करणार की नाही. कोण करणार आहे. एजन्सीवर कार्यवाही का होत नाही.

श्री.समीर राजूरकर :मा.आयुक्त सभेला का उपस्थित नाही.

मा.महापौर :मागिल बैठकीत प्रशासनाला आदेशीत केले होते प्रशासन कामे का करीत नाही. कशामूळे पाणीपुरवठयात खंड पडतो. जायकवाडीतून पाणी येत नाही का, कर्मचारी काय काम करतात सर्व खुलासा करावा.

श्री.मीर हिदायत अली :६-७ दिवसानंतर पिण्याचे पाणी येते.दुषित पाणी दिले जाते. ही परीस्थिती का निर्माण झाली. एजन्सी काम करीत नसेल तर कार्यवाही करावी महापालिकेने पाणीपुरवठा व्यवस्थापन सांभाळावे.

श्री.रेणुकादास वैद्य :सर्व भागात पिण्याचा पाण्याचा प्रश्न गंभीर झालेला आहे हा प्रश्न एजन्सीकडून सुटेल का ?

या वेळी अनेक स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात. सभागृहात घोषणा देतात.

मा.महापौर :०५ मिनिटासाठी सभा तहकूब करण्यात येते. (वेळ दुपारी २-३६ वा.पुन्हा ३-१० वा सभेला सुरूवात)

श्री.मीर हिदायअत अली: अनेक वेळा आदेशीत करून सुध्दा प्रशासन पाणीपुरवठा करण्यामध्ये सुधारणा करीत नाही. ६-७ दिवसानंतर पाणी येत आहे पाणीपट्टी पुर्ण घेणार व पाणी देणार नाही. जनतेला हे मान्य नाही पाणीपुरवठा सुरळीत होणार की नाही.

श्री.किशोर नागरे :पाणीपुरवठा सबंधी व विकास कामाच्या संदर्भात अनेकदा बैठक झाली त्यात ठराव पास केले बैठकीत जी चर्चा केली त्यानुसार ४-५ सुचना देऊन प्रशासनाला आदेशीत करावे. ज्या दिवशी पाणी येणार नाही त्यावेळी स.सदस्य कळवावे. ज्या ठिकाणी ड्रेनेज पाणी मिसळते अशा ठिकाणी तातडीने पाणी पुरवठयाची कामे करावी. पाणी सोडण्याच्या वेळ निश्चित करावी.

| | |
|---|---|
| श्री.राजू शिंदे | :सात दिवसाची नोटीस देऊन संमातरकडे असलेले पाणीपुरवठा वितरण व्यवस्था मनपाकडे घेणार होते. महापालिका पाणीपुरवठा संबधीत कामे सुरू करणार असे मागील बैठकीत सांगण्यात आले. तेंव्हापासून आजपर्यत कोठे काम सुरू केले. पाण्याची समस्या बाबत कोणत्या अधिका-याशी संपर्क करायचा तो ही खुलासा घ्यावा. |
| श्री.खाजा शरफोद्दीन | :चार बैठकीपासून चर्चा होते खुलासा घेतला जातो कुठलेही लिकिजेस बंद केले जात नाही. नुसती चर्चा होते हे बरोबर नाही. |
| कार्य.अभियंता(पापू) | :समांतर एजन्सीला नोटीस दिली ५-३-२०१५ रोजी नोटीसची मुदत संपते. प्रत्यक्षात पाईप लाईनची कामे करण्यासाठी यादी केली यादी प्रमाणे ४ ठिकाणी एन-११ साई मैदान, कासलीवाल विश्व तिरूपती अपार्टमेंन्ट, एल एम सेक्टर , गल्ली नंबर ४ किराडपूरा या ठिकाणी काम सुरू केले. |
| श्री.राजू शिंदे | :कोणाकडुन काम करून घेत आहोत.कुठे काम चालू आहे माहिती घ्यावी. |
| कार्य.अभियंता(पापू) | :संमातर एजन्सीकडून काम करून घेत आहोत. |
| श्री.संजय केनेकर | :तातडीची कामे करण्या बाबत बैठकीत निर्णय घेतला होता कोणत्या भागात केंव्हा पासून कामे सुरू केले. |
| कार्य.अभियंता(पापू) | :एन-११ साई मैदान, कासलीवाल विश्व तिरूपती अपार्टमेंन्ट, एलएम सेक्टर , गल्ली नंबर ४ किराडपूरा या ठिकाणी काम सुरू केले. |
| श्री.संजय केनेकर | :महत्वाची व तातडीची जी कामे करणार होते ती सुरू केली नाही. |
| श्री.मीर हिदायत अली | :शंहागजच्या टाकीमध्ये पुरेसे पाणी येत नाही. वार्डात २० दिवसात तीन वेळेस पाणी येते. जेथून उपसा होतो तेथून कमी पाणी येत आहे का? पाण्यासाठी स.सदस्यांना टाकीच्या ठिकाणी जाऊन बसावे लागते. ही वेळ का आली, दोन दिवसा आड पाणी केंव्हा दिले जाणार आहे. |
| कार्य.अभियंता(पापू) | :हर्सुल येथून पाणीपुरवठा होण्यासाठी विदयुतपंप चालू केले. दोन दिवसात पाणी पुरवठा सुरळीत होणार आहे. |
| श्री.संजय चौधरी | :माझ्या वार्डात लाईनचे काम करण्यासाठी टेंडर झाले काम सुरू केले नाही २० दिवसापुर्वी लाईन फुटली. दुरूस्तीसाठी कंपनीच्या लोकांना फोन केला उचलत नाही २१ दिवसापासून दोन गल्ल्यामध्ये पाणीच आले नाही. |
| कार्य.अभियंता(पापू) | :कंपनीचे लोकांना समज दिली जाईल त्यांचे वरिष्ठ असतील त्यांना सुचना दिल्या जातील. |
| श्री.प्रमोद राठोड | :जेवणामध्ये आळी निघाली याबाबत कार्यवाही करावी. |
| मा.महापौर | :मागील २-३ महिण्यापासून आवश्यक तेवढा पाणीपुरवठा होत नाही.नागरीक सदस्यांच्या घरी जाऊन पाणी देण्याची मागणी करतात. पाणी पुरवठयाची कामे करावी व सुरळीत पाणी पुरवठा व्हावा यासाठी प्रशासनाला आदेशीत केले होते त्यानुसार कामे होत नाही. जेथे दुषित पाणी येते तेथील काम तातडीने करावे. वॉल लिकिजेस असेल ती कामे करावी. ज्या भागात ठरल्याप्रमाणे पाणी येत नाही तेथे पर्यायी व्यवस्था करावी. १० कामापैकी ४ कामे केली तर ६ बाकी आहे अशी सर्व कामे तातडीने ०२ दिवसात सुरू करावी. प्रत्येक भागात पाणी पुरवठा |

सुरळीत करावा. आताच म्हटल्याप्रमाणे जेवणामध्ये आळी निघाली त्याबाबतीत नगरसचिव यांनी चौकशी करून योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.राजू शिंदे :समांतर कंपनीला ५.२५ कोटी देत होतो ते देण्याचे थांबविले का ?त्या रक्कमेतून वार्डातील पाणीपुरवठयाची कामे करावी असे आदेशीत केले होते ती कामे होणार का?

डॉ.जफर खान :वसुली करण्या संदर्भात मा.पालक मंत्री यांनी आदेशीत केले होते किती वसुली झाली माहिती घ्यावी.

श्री.किशोर नागरे :विषय पत्रिका घेण्यात यावी.

श्री.राजू शिंदे :मुख्यलेखाधिकारी श्री.थोरात यांना एक वर्षाच्या कार्यकाळासाठी काम करण्याचा ठराव घेतला त्यानंतर ठराव आला नाही काम करण्याची मुदतवाढ दिली नाही दीड वर्षापासून मुदतवाढीचा ठराव सभागृहा समोर का ठेवलेला नाही. १४ जुन २०१२ ते १४ जून २०१३ पर्यतची मुदतवाढ दिली होती. त्यानंतर मुदतवाढीचा ठराव आलेला नाही.

आस्थापना अधिकारी-१ :याची निश्चित माहिती माझ्याकडे नाही संचिका मागून माहिती घेवून सांगतो.

श्री.राजू शिंदे :ठरावाची प्रत माझ्याकडे आहे एक वर्षासाठी ठराव मंजूर केलेला आहे त्यानंतर ठराव आलेला नाही. का प्रस्ताव आलेले नाही इल्लिगल काम कसे करतात. हे योग्य आहे का?

श्री.गिरजाराम हाळनोर :डेप्युटेशनवर आलेले कोणत्याच अधिका-यांचे ठराव मुदतवाढीसाठी आलेले नाही.

श्री.किशोर नागरे : असे सर्वसाधारण सभेला येण्याची आवश्यकता आहे की नाही.

श्री.राजू शिंदे :जुन २०१३ पर्यंत मुदत दिलेली होती त्यानंतर ठराव आलेला नाही. ठरावाची प्रत माझ्या कडे आहे. इल्लिगल काम करीत आहे.

आस्थापना अधिकारी-१ :प्रतिनियुक्ती संदर्भातील संचिका मागून घेतो. त्यानंतर पुढील कार्यवाही केली जाईल.

मा.महापौर :प्रशासनाने या बाबतीत योग्य ती कार्यवाही करावी.

श्री.राजू शिंदे :शहरात तसेच एन-१ एन-२ भागात मोकाट कुत्र्याची संख्या मोठया प्रमाणात आहे. अनेक नागरीकांना चावा घेत आहे. याचा बदोबस्त होणार की नाही.

मा.महापौर :संबधीत अधिकारी यांनी याची नोद घेवून कार्यवाही करावी.

श्री.किशोर नागरे :मागील फेब्रुवारी महिण्यात ५०७ कर्मचा-यांना कायमस्वरूपी सेवेत घेतलेले आहे. त्याबरोबरच १४ कर्मचारी चुकून राहिलेले आहे त्या कर्मचा-यांनाही नियमानुसार सेवेत घेण्याचे प्रशासनाला आदेशीत करावे.

श्री.मीर हिदायत अली :११२४ कर्मचारी भरतीतील १४ कर्मचारी राहिलेले आहे त्यांचे प्रकरणात नॉरमल त्रुटया आहे. त्यांना सेवेत घ्यावे व न्याय द्यावा.

सौ.शोभा काळे :११२४ मधील १४ कर्मचारी यांना कामावरून कमी केले त्यांना परत घेण्यात यावे.

मा.महापौर :आताच सुचना केल्याप्रमाणे ११२४ मधील सदरील १४ कर्मचारी यांचे बाबतीत प्रशासनाने योग्य ती नियमानुसार कार्यवाही करावी.

**विषय क्रमांक ७५८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरातील महत्वांच्या ऐतिहासीक स्थळांसाठी पर्यटनाच्या दृष्टीने सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने औरंगाबाद पर्यटन मेगा सर्किटचा प्रस्ताव महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळातर्फे केंद्र शासनाच्या पर्यटन मंत्रालयाकडे मान्यतेस्तव सादर करण्यात आलेला होता. या प्रस्तावास दिनांक ३१.०३.२०१३ च्या केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या आदेशानुसार औरंगाबाद मेगा सर्किटचा प्रस्ताव रक्कम रुपये २३४३.२० लक्ष मंजुरी प्राप्त झालेली असुन या प्रस्तावा अंतर्गत मंजुर प्राप्त कामांपैकी महानगरपालिकेशी संबंधित खालील तीन कामांसाठी निधी महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.

१) टुरिस्ट टॅक्सी स्टँड विकसीत करणे बाबत (रुपये ५७.०२ लक्ष):-

२) रस्त्यांचे सुशोभीकरण करणे (रुपये ४२०.५१ लक्ष):-

**३)** मजनुहील येथे रोड गार्डन विकसीत करणे (रुपये ३५५.७१ लक्ष):-

उपरोक्त दर्शविल्यानुसार औरंगाबाद पर्यटन मेगा सर्किट अंतर्गत विविध पर्यटन स्थळांचा विकास करणेसाठी महानगरपालिकेशी संबंधीत तीन प्रस्तावित कामे करणेसाठी दिनांक १६.०१.२०१४ रोजी संपन्न झालेल्या मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्र.४५५ मंजुर केलेला आहे.

तथापी शहरातील ऐतिहासीक पाणचक्की या स्थळाचा पर्यटनाच्या अनुषंगाने विकास करणेसाठी मा.संचालक पर्यटन विभाग, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक ०५.११.२०१४ रोजीच्या पत्रान्वये विचारणा केलेली आहे. त्या अनुषंगाने ऐतिहासीक पाणचक्कीचा विकास करणेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ मंडळ, औरंगाबाद यांनी दिनांक ३०.१२.२०१४ अन्वये नाहरकत प्रमाणपत्र उपलब्ध करुन दिलेले आहे.

पाणचक्की स्थळाचा विकास करणेसाठी रक्कम रुपये ३२०.७२ एवढा निधी मंजुर झालेला आहे. या अंतर्गत पाणचक्की परिसरात सौंदर्यीकरणासाठी लँडस्केपींग करणे, विद्युतीकरण करणे, वाहनतळ विकसीत करणे, सुरक्षा कॅबीन तयार करणे, फुड कोर्ट तयार करणे, रेन वॉटर हार्वेस्टींग करणे, पावसाळी पाणी निचरा होणेसाठी नाली बांधणे, वॉटर ट्रिटमेंट प्लांट तयार करणे, माहिती फलक (सायनेजेस) लावणे इत्यादी कामांचा समावेश आहे. सदर निधी ही महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाकडुन औरंगाबाद महानगरपालिकेस प्राप्त होणार आहे.

करीता उपरोक्त दर्शविलेल्या कामा अंतर्गत प्रस्तावित कामांसाठी अंदाजपत्रके तयार करणे, प्रकल्पांचे नकाशे तयार करणे तसेच निविदा कार्यवाही करणेसाठी परवानगी मिळणे आणि सदर योजनेचा प्रकल्प आराखडा तयार करणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या प्रशासकीय मंजुरीस्तव सादर.

**संवाद:-**

श्री.किशोर नागरे :आवश्यक कामे करण्यासाठी अदांजपत्रक तयार करण्याचे प्रशासनाला आदेशीत करावे.यात भारत माता मंदीर व मराठवाडा मुक्त्‍ी संग्राम या वास्तुचा विकासासाठी समावेश करावा.

मा.महापौर :- विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरातील ऐतिहासीक पाणचक्की या स्थळाचा पर्यटनाच्या दृष्टीने सोई-सुविधा उपलब्ध करुन देण्याच्या अनुषंगाने विकास करणेसाठी रक्कम रुपये ३२०.७२ एवढा निधी मंजुर झालेला असून या अंतर्गत पाणचक्की परिसरात सौंदर्यीकरण करणे व इतर प्रस्तावीत कामासाठी अंदाजपत्रके तयार करणे, प्रकल्पांचे नकाशे तयार करणे तसेच निविदा कार्यवाही करणेसाठी परवानगी मिळणे आणि सदर योजनेचा प्रकल्प आराखडा तयार करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७५९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.दुर्गेश मिलींद जहागिरदार यांची पोलंड येथे आयोजित आंतरराष्ट्रीय तलवार बाजीत निवड झाली असून त्यांना या स्पर्धेसाठी पोलंड येथे जाण्यासाठी व स्पर्धेत सहभागी होण्याकरीता लागणारे साहित्य इत्यादी खर्चासाठी रक्कम रु.४ लक्ष (अक्षरी चार लक्ष रुपये मात्र) एवढा अपेक्षीत आहे. तरी त्यांना महापालिकेच्या माध्यामातुन आर्थिक मदत देण्याकरीता सर्वसाधारण सभेत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर, श्री. वैद्य रेणुकादास (राजु) दत्तोपंत

**अनुमोदक:-** श्री.किशोर बाबुराव नागरे, श्री.सुर्यकांत सुभानराव जायभाये.

मा.महापौर :प्रशासनाने नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.दुर्गेश मिलींद जहागिरदार यांना पोलंड येथे जाण्यासाठी व स्पर्धेत सहभागी होण्याकरीता लागणारे साहित्य ई. खर्चासाठी रक्कम रु.४ लक्ष (अक्षरी चार लक्ष रुपये मात्र) महापालिकेच्या माध्यामातुन आर्थिक मदत देण्यासाठी नियमानुसार कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७६०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, बौध्दलेणी परिसरात पर्यटकांसाठी शेड बनविणे अत्यंत आवश्यक आहे. या ठिकाणी बऱ्याच भागातुन पर्यटक येत असतात. उन्हाळ्यामुळे त्यांना थांबण्यासाठी व्यवस्थित जागा उपलब्ध नसल्यामुळे तेथे माझ्या स्वेच्छानिधीतुन रक्कम रु.१.५० लक्ष पर्यंत खर्च करुन शेड उभारणे बाबतचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.कृष्णा सांडुजी बनकर, श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे

**अनुमोदक:-** श्री.समीर सुभाष राजुरकर.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बौध्दलेणी परिसरात पर्यटकांसाठी पालिका सदस्य श्री.कृष्णा बनकर यांच्या स्वेच्छानिधीतुन रक्कम रु.१.५० लक्ष पर्यंत खर्च करुन शेड उभारण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७६१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्वसाधारण सभेत सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र | रद्द करावयाचे कामाचे नांव | करावयाचे कामाचे नांव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात वार्ड-फ वरील स्पील १२७ अ.क्र.४१ वार्ड क्र.८५ अंतर्गत श्रीजी हॉस्पीटल मागे सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.१०.०५ लक्ष. | १. शिवाजीनगर येथील अे सेक्टर मधील गणपती मंदिरासमोर सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.१०.०० लक्ष.<br>२. शिवाजीनगर येथील अे सेक्टर मधील पाण्याच्या टाकी मागे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.०८.८५ लक्ष. |
| ०२ | सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात वार्ड-फ वरील स्पील १२७ अ.क्र.४३ वार्ड क्र.८५ अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीट करणे. र.रु.०८.८५ लक्ष. | |

**सुचक:-** श्री.सुशिल तुकाराम खेडकर **अनुमोदक:-** श्रीमती छायाताई साईनाथ वेताळ

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभेत सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पातील खालील लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | रद्द करावयाचे कामाचे नांव | करावयाचे कामाचे नांव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात वार्ड-फ वरील स्पील १२७ अ.क्र.४१ वार्ड क्र.८५ अंतर्गत श्रीजी हॉस्पीटल मागे सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.१०.०५ लक्ष. | १. शिवाजीनगर येथील अे सेक्टर मधील गणपती मंदिरासमोर सिमेंट कॉंक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.१०.०० लक्ष. |
| ०२ | सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात वार्ड-फ वरील स्पील १२७ अ.क्र.४३ वार्ड क्र.८५ अंतर्गत रस्त्याचे कॉंक्रीट करणे. र.रु.०८.८५ लक्ष. | २. शिवाजीनगर येथील अे सेक्टर मधील पाण्याच्या टाकी मागे कॉंक्रीट रस्ता तयार करणे. र.रु.०८.८५ लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७६२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सर्वसाधारण सभेत सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पातील लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

| अ.क्र | रद्द करावयाचे कामाचे नांव | करावयाचे कामाचे नांव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात वार्ड-फ वरील स्पील ११६ अ.क्र.५२ वार्ड क्र.९९ अंतर्गत शिवाजीनगर येथील देवगिरी हिल्स सेक्टर जे ते टेलीफोन भवन पर्यंतच्या मुख्य रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणे. र.रु.१०.०० लक्ष. | १. शिवाजीनगर येथील सी सेक्टर मधील अकरावी योजना येथील रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणे र.रु.१०.०० लक्ष. |

**सुचक:-** श्रीमती छायाताई साईनाथ वेताळ **अनुमोदक:-** श्री.सुशिल तुकाराम खेडकर

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सर्वसाधारण सभेत सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पातील खालील लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | रद्द करावयाचे कामाचे नांव | करावयाचे कामाचे नांव |
|---|---|---|
| ०१ | सन २०१४-२०१५ च्या अर्थसंकल्पात वार्ड-फ वरील स्पील ११६ अ.क्र.५२ वार्ड क्र.९९ अंतर्गत शिवाजीनगर येथील देवगिरी हिल्स सेक्टर जे ते टेलीफोन भवन पर्यंतच्या मुख्य रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणे. र.रु.१०.०० लक्ष. | १. शिवाजीनगर येथील सी सेक्टर मधील अकरावी योजना येथील रस्त्याचे पुर्न:डांबरीकरण करणे र.रु.१०.०० लक्ष. |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७६३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेच्या अंतर्गत २००८ पासून १२ माध्यमिक शाळा कार्यरत असुन त्यासाठी महाराष्ट्र शासनाकडुन शाळा चालविणेसाठी परवानगी मिळाली आहे. सर्व १२ (माध्यमिक) शाळेत १० वीचे वर्ग चालतात. ८ वी ते १० वी वर्गाच्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी दि.०२.०१.२०१२ पासुन तासिका तत्वावर माध्यमिक शिक्षक म्हणून नियुक्ती देण्यात आलेली आहे. सन २०११-२०१२ च्या संच मान्यते नुसार ४८ शिक्षक मान्यता शासनाकडुन मिळालेली आहे. सन २०१३-२०१४ या शैक्षणिक वर्षात महानगरपालिकेच्या सर्व शाळांचा निकाल महाराष्ट्रात प्रथम क्रमांकावर होता या यशासाठी सर्व तासिका तत्वावरील शिक्षकांचा मोलाचा वाटा आहे.

तासिका तत्वावरील कार्यरत शिक्षक यांची सेवा महानगरपालिकेस आवश्यक असुन माध्यमिक शाळा संहिता (१९८१) नुसार विहीत केल्या प्रमाणे या शिक्षकांना पदनाम देऊन कार्यादेश देणे गरजेचे आहे. तसेच सर्व शिक्षकांची वैयक्तीक मान्यता ही अनुदानास आवश्यक बाब असुन भविष्यात या शिक्षकांच्या वेतनाचा भार महानगरपालिकेच्या तिजोरीवर पडणार नाही.

तरी महानगरपालिकेतील माध्यमिक शाळेतील तासिका तत्वावरील शिक्षकांना माध्यमिक सहशिक्षक म्हणून पदनाम देऊन वैयक्तीक मान्यतेसाठींचा प्रस्ताव मा.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांचेकडे पाठविणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.संजय किसनराव केनेकर, श्री.किशोर बाबुराव नागरे.

**अनुमोदक:-** श्री.अफसर खान यासीन खान, श्री.मिर हिदायात अली मिर बसालत अली

**संवाद:-**

श्री.संजय केनेकर :मंजूर करावे,महापालिकेवर यामुळे खर्चाचा बोजा पडणार नाही.

मा.महापौर :प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या अंतर्गत २००८ पासून १२ माध्यमिक शाळा कार्यरत असुन या शाळेत ८ वी ते १० वी वर्गाच्या विद्यार्थ्यांना शिकविण्यासाठी तासिका तत्वावरील कार्यरत शिक्षक यांची सेवा महानगरपालिकेस आवश्यक असुन माध्यमिक शाळा संहिता (१९८१) नुसार विहीत केल्या प्रमाणे या शिक्षकांना माध्यमिक सहशिक्षक म्हणून पदनाम देऊन वैयक्तीक मान्यतेसाठींचा प्रस्ताव मा.शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद औरंगाबाद यांचेकडे पाठविण्याकरीता प्रशासनाने नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७६४:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगपालिकेत केंद्र शासन पुरस्कृत आर.सी.एच. ही योजना आरोग्य विभागामार्फत राबविण्यात येत होती. या योजनेत ९० लिंक वर्कर २००२ पासुन र.रु.१७५०/- व ६ पर्यवेक्षक र.रु.३०००/- या तुटपुंज्या मानधनावर कार्यरत आहेत. या योजनेचा कालावधी संपुष्टात आल्याने त्या ऐवजी आता एन.यु.एच.एम. या नविन नावाने आरोग्य विभागा अंतर्गत ही योजना राबविण्यात येत आहे. या एन.यु.एच.एम. योजनेत त्यांना अशा वर्कर या पदावर समाविष्ट करण्यात आलेले आहे. शहरातील विविध महानगरपालकेच्या आरोग्य केंद्र अंतर्गत हे कर्मचारी १२ वर्षापासुन अथक परिश्रम करुन आपली उपजिवीका भागवित आहे. त्यांच्या सेवेची महानगरपालिकेला आवश्यकता आहे. त्यांची कौटुंबीक परिस्थिती नाजुक असुन अमरावती महानगरपालिकेच्या धर्तीवर औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे ९० लिंकवर्कर्स यांना सन्मानजनक मानधन प्रत्येकी र.रु.२०००/- प्रतिमाह

आणि ६ पर्यवेक्षक यांना प्रत्येकी र.रु.५०००/- तसेच त्यांच्या कार्यमुल्यांकनावर आधारीत प्रतिमाह रक्कम अदा करण्या बाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ सादर.

**सुचकः-** श्री.संजय किसनराव केनेकर, श्री.किशोर बाबुराव नागरे.

**अनुमोदकः-** श्री.अफसर खान यासीन खान, श्री.मिर हिदायात अली मिर बसालत अली

मा.महापौर :पुर्वीप्रमाणे मानधन चालू ठेवावे. मंजूर

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सदर कर्मचारी यांना पुर्वीप्रमाणेच मानधन चालू ठेवण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७६५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेत सिडको-हडको भागातील बचत गटामार्फत कार्यरत असलेल्या साफसफाई कामगार तसेच माळी फवारणी,ड्रेनेज पंप हाऊस कामगारांना सिडको हस्तांतर पुर्वीपासुन सिडको-हडको भागामध्ये काम करत आहे. सिडको हडकोतील साफसफाई कामगार मागील २० वर्षांपासुन सिडको हडको भागात कंत्राटी पध्दतीने कायम काम करत आहेत. तरी या कामगारांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम स्वरुपी सामावुन घेणेबाबत प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्री.संजय किसनराव केनेकर.

**अनुमोदकः-** श्री.प्रमोद प्रल्हाद राठोड,श्री.सुरेंद्र मानीकराव कुलकर्णी,श्री.विजेंद्र मुरलीधर जाधव.

मा.महापौर :- प्रशासनाने नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगपालिकेत सिडको-हडको भागातील बचत गटामार्फत कार्यरत असलेल्या साफसफाई कामगार तसेच माळी फवारणी,ड्रेनेज पंप हाऊस हे कामगार सिडको हस्तांतरनाच्या पुर्वीपासुन मागील २० वर्षांपासुन या भागात कंत्राटी पध्दतीने कायम काम करत असल्यामुळे या कामगारांना महानगरपालिकेच्या आस्थापनेवर कायम स्वरुपी सामावुन घेण्यासाठी प्रशासनाने नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७६६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१२ मधील जयभिमनगर येथील प्रवेशद्वार ते सुदाम (मामा) मिसाळ यांच्या घरापर्यंतच्या रस्त्यास सुदाम (मामा) मिसाळ मार्ग असे नाव देण्यासाठी नागरीकांची वारंवार मागणी होत आहे.

करीता नागरीकांची मागणी लक्षात घेता जयभिमनगर मधील प्रवेशद्वार ते सुदाम (मामा) मिसाळ यांच्या घरापर्यंतच्या रस्त्यास सुदाम (मामा) मिसाळ मार्ग असे नाव देण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचकः-** श्रीमती ज्योती रमेश खिल्लारे. **अनुमोदकः-** श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठरावः-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१२ मधील जयभिमनगर येथील प्रवेशद्वार ते सुदाम (मामा) मिसाळ यांच्या घरापर्यंतच्या रस्त्यास सुदाम (मामा) मिसाळ मार्ग असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७६७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.१२ मधील घाटी रोड ते बिस्मिल्ला कॉलनी पर्यंतच्या रस्त्यास मुमताजउद्यीन फैयाजउद्यीन फारुखी हे प्रभागातील ज्येष्ठ नागरीक असुन

त्यांना सामाजीक,सांस्कृतिक कार्यक्रमात मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदविला आहे. त्यांनी आसेफिया कॉलनीची स्थापना केली आहे. त्यामुळे त्यांचे नाव लौकीक व्हावे करीता नागरीकांनी घाटी रोड ते बिस्मील्ला कॉलनी पर्यंतच्या रस्त्यास मुमताजउद्यीन फैयाजउद्यीन फारुखी मार्ग असे नाव देण्यासाठी वारंवार मागणी होत आहे.

करीता नागरीकांची मागणी लक्षात घेता घाटी रोड ते बिस्मील्ला कॉलनी पर्यंतच्या रस्त्यास मुमताजउद्यीन फैयाजउद्यीन फारुखी मार्ग असे नाव देण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्रीमती ज्योती रमेश खिल्लारे. **अनुमोदक:-** श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.१२ मधील घाटी रोड ते बिस्मील्ला कॉलनी पर्यंतच्या रस्त्यास मुमताजउद्यीन फैयाजउद्यीन फारुखी मार्ग असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७६८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०९ नंदनवन कॉलनीतील माऊली चौक ते गंगाबावडी रोडवर प्रवेशद्वार उभारुन त्यास माता रमाई आंबेडकर असे नाव देण्याबाबत वारंवार मागणी करत आहे. तरी नागरीकांची मागणी लक्षात घेता नंदनवन कॉलनी माऊली चौक ते गंगाबावडी पर्यंतच्या रोडवर प्रवेशद्वार उभारुन तयास माता रमाई आंबेडकर असे नाव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे. **अनुमोदक:-** श्रीमती ज्योती रमेश खिल्लारे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.०९ नंदनवन कॉलनीतील माऊली चौक ते गंगाबावडी रोडवर प्रवेशद्वार उभारुन त्यास माता रमाई आंबेडकर असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७६९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०९ नंदनवन कॉलनी येथील महानगरपालिका आरोग्य केंद्रा समोरील चौकास संत विश्राम बाबा चौक असे नाव देण्याबाबत नागरीकांची वारंवार मागणी होत आहे.

करीता नागरीकांची मागणी लक्षात घेता महानगरपालिका आरोग्य केंद्रा समोरील चौकास संत विश्राम बाबा चौक असे नाव देणेसाठी प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे. **अनुमोदक:-** श्रीमती ज्योती रमेश खिल्लारे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.०९ नंदनवन कॉलनी येथील महानगरपालिका आरोग्य केंद्रा समोरील चौकास संत विश्राम बाबा चौक असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७०:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.०९ नंदनवन कॉलनी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मैदानालगत (पुनवटकर यांच्या घरा समोरील) चौकास महात्मा ज्योतीबा फुले चौक असे नाव देण्यात येऊन सदरील चौकाचे सौंदर्यीकरण करण्यात यावे अशी वारंवार नागरीकांची मागणी होत आहे.

करीता नागरीकांची मागणी लक्षात घेता डॉ.बाबासाहेब आंबेडकर मैदानालगत (पुनवटकर यांच्या घरा समोरील) चौकास महात्मा ज्योतीबा फुले चौक असे नाव देण्यात येऊन सदर चौकास सौंदर्यीकरण करण्यासाठीचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.मिलींद यशवंतराव दाभाडे. **अनुमोदक:-** श्रीमती ज्योती रमेश खिल्लारे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.०९ नंदनवन कॉलनी येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर मैदानालगत (पुनवटकर यांच्या घरा समोरील) चौकास महात्मा ज्योतीबा फुले चौक असे नाव देण्यास व सदरील चौकाचे सौंदर्यीकरण करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, दिनांक ११.११.२०१४ च्या सभेत सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात खालील पाच कामे रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरे विकास कामासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध करून द्यावी व लेखाशिर्ष बदलाचा खालील प्रस्ताव या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आले होते परंतु ते जुनेच काम कायम ठेवण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.शहानवाज खान रहेमान **अनुमोदक:-** श्री.जुबेर गाझी असीर अहमद

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक ११.११.२०१४ च्या सभेत सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात पाच कामे रद्द करून प्रभागात आवश्यक असणारी दुसरे विकास कामासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध करून द्यावी व लेखाशिर्ष बदलाचा प्रस्ताव या सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्यात आले होते प्रस्तावित केल्याप्रमाणे जुनेच काम कायम ठेवण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री.संतोष बाबुराव कोमटकर रा.गारखेडा पुंडलीकनगर औरंगाबाद यांचा अपघात झालेला असुन या अपघातात त्यांच्या पाठीच्या मणका तुटल्यामुळे त्यांना शस्त्रक्रीया करणे अत्यावश्यक झालेले आहे. त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत हलाखीची असल्यामुळे शस्त्रक्रीयेचा खर्च ते करु शकत नाही. तरी महानगरपालिकेतर्फे त्यांना रक्कम रुपये ०२.०० लक्ष आर्थिक मदत देण्यात यावी. करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.गोपाळ शरदराव कुलकर्णी **अनुमोदक:-** श्रीमती प्राजक्ता विश्वनाथ राजपूत

मा.महापौर :नियमानुसार कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे श्री.संतोष बाबुराव कोमटकर रा.गारखेडा पुंडलीकनगर औरंगाबाद प्रस्तावात नमुद कारणासाठी रक्कम रुपये ०२.०० लक्षची आर्थिक मदत नियमानुसार देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७३:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, गेल्या दहा वर्षात शहराची झपाट्याने वाढ झालेली आहे व त्या प्रमाणे महानगरपालिकेने सुध्दा नागरीकांना मुलभुत सुविधा देण्याचे काम केलेले आहे. शहरात विविध ठिकाणी चौक/दुभाजक/स्मशान भुमी रस्ता रुंदीकरण विकसीत करण्यात आले परंतु आज घडीला मनपाची आर्थीक परिस्थिती अत्यंत नाजुक असल्याने मनपा चौक/दुभाजक/स्मशानभुमी इत्यादी विकसीत करण्या करीता शहरातील व्यापारी संघटना,उद्योजक,लघुउद्योजक,सेवाभावी संस्था यांनी विकसीत करण्यासाठी देण्यात यावे व त्यांची देखभाल व दुरूस्ती सुध्दा संबंधीतांकडे देण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.किशोर बाबुराव नागरे,श्री.विजय लक्ष्मण वाघचौरे,श्री.गोपाळ शरदराव कुलकर्णी.

**अनुमोदक:-**श्री.प्रफुल्ल लालचंद मालानी,श्रीमती सावित्रीबाई हिरालाल वाणी,
श्री.विरभद्र रामलिंग गादगे.

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे शहरात विविध ठिकाणी चौक/दुभाजक/स्मशान भुमी रस्ता रुंदीकरण विकसीत करण्या करीता शहरातील व्यापारी संघटना,उद्योजक,लघुउद्योजक,सेवाभावी संस्था यांनी विकसीत करणे व त्यांची देखभाल व दुरूस्ती सुध्दा संबंधीतांकडे देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७४ :-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, क्रांतीचौक ते रेल्वेस्टेशन या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करण्यात आले असून या रस्त्यास हिंदू ह्रदयसम्राट मा.बाळासाहेब ठाकरे यांचे नाव देण्यात आलेले आहे. या रस्त्याचे महत्व पाहता व संभाजी नगर शहरावर शिवसेनाप्रमुखांचे जे प्रेम होते त्यासाठी या रस्त्यावर क्रांतीचौक व रेल्वेस्टेशन या दोन्ही ठिकाणी स्वागत कमान उभारुन त्या कमानीवर मा.बाळासाहेब ठाकरे या नावाचा उल्लेख करावा अशी सर्व शिवसैनिकांची व नागरीकांची मनापासून इच्छा आहे. याप्रमाणे मा.हिंदू ह्रदयसम्राट मा.बाळासाहेब ठाकरे महामार्गावर क्रांतीचौक व रेल्वेस्टेशन या दोन्ही ठिकाणी कमानी उभारुन त्यावर मा.बाळासाहेब ठाकरे या नावाचा उल्लेख करावा.

करीता, प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.विजय लक्ष्मण वाघचौरे **अनुमोदक:-** श्री.त्रिंबक गणपतराव तुपे

मा.महापौर :विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे हिंदू ह्रदयसम्राट मा.बाळासाहेब ठाकरे महामार्गावर क्रांतीचौक व रेल्वेस्टेशन या दोन्ही ठिकाणी कमानी उभारुन त्यावर मा.बाळासाहेब ठाकरे या नावाचा उल्लेख करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७५:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद महानगरपालिकेत यु.बी.एस.पी.योजनेअंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यासाठी श्रीमती राजकुमारी लक्ष्मण गायकवाड व श्रीमती सिंधू कडूबा सुरडकर यांची समुदाय संघटक या पदावर विहित पध्दतीचा अवलंब करुन सन १९९२-९३ मध्ये रु.१२००/- मानधनावर नियुक्ती करण्यात आलेली आहे. सदरहु कर्मचाऱ्यांची नोकरीची कमाल वयोमर्यादा संपुष्टात आलेली आहे. त्यामुळे त्यांना भविष्यात नोकरीची सुरक्षितता राहिलेली नाही.

इतर महानगरपालिकांमध्ये यु.बी.एस.पी.योजनेअंतर्गत नियुक्त केलेल्या कर्मचाऱ्यांना सेवेत कायमस्वरुपी सामावून घेतले आहे. तसेच नाशिक महानगरपालिकेतील सदर योजनेतील कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी नियुक्ती देण्यात आलेली आहे. त्याच धर्तीवर समुदाय संघटक या पदावर श्रीमती राजकुमारी लक्ष्मण गायकवाड व श्रीमती सिंधू कडूबा सुरडकर या दोन महिला कर्मचाऱ्यांना पूर्वलक्षीप्रभावाने कायमस्वरुपी नियुक्ती देणेबाबत आवश्यक कार्यवाही व्हावी. तसेच सदरील प्रस्ताव पारित झाल्यानंतर शासनाकडे मंजुरीसाठी पाठविण्या बाबत मान्यता व्हावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.गिरजाराम नानाराव हाळनोर

**अनुमोदक:-** श्री.विजय लक्ष्मण वाघचौरे,श्री.समिर सुभाष राजुरकर.

**संवाद:-**

श्री.संजय केनेकर :समुदाय संघटक दोनच नाही. ते आस्थापनेवर आहेत का माहिती घ्यावी.

श्री.गिरजाराम हाळनोर :या कर्मचा-याचे वय ५५ वर्ष होऊन गेले. इतर महापालिकेत अशा पदावरील कर्मचारी यांना कायम केले.

श्री.संजय केनेकर :असे अनेक कर्मचारी आस्थापनेवर आहे त्यांचे वय जास्तीचे झालेले आहे.हे कर्मचारी आस्थापनेवर आहे का विचारणा करावी.

श्री.गिरजाराम हाळनोर :या कर्मचा-यांना आस्थापनेवर घेवून पुढील कार्यवाही करावी.यांना आता इतरत्र ठिकाणी नोकरी मिळणार नाही गरीब महिला कर्मचारी आहे.

या वेळी स.सदस्य एकाच वेळी बोलत असतात.

श्री.काशिनाथ कोकाटे :सभागहाचे कामकाज नियमानुसार चालले पाहिजे.हा प्रस्ताव स.सदस्यांनी ठेवलेला आहे प्रशासनाकडुन खुलासा घेता येत नाही.

श्री.गिरजाराम हाळनोर :हा प्रस्ताव मंजूर करावा प्रशासन नियमाप्रमाणे कार्यवाही करील.

श्री.संजय केनेकर :प्रशासनाकडुन खुलासा घ्यावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :प्रशासनाचा खुलासा कशासाठी मागता,प्रशासनाचा हा प्रस्ताव नाही नियम सोडून कामकाज चालवू नये.

श्री.विजेंद्र जाधव :आस्थापनेवर आता घेता येतात का?

श्री.संजय केनेकर :आस्थापनेवर हे कर्मचारी घेता येतात की नाही प्रशासनाकडून खुलासा घ्यावा.

श्री.काशिनाथ कोकाटे :स.सदस्यांचा प्रस्ताव आहे स.सदस्यांनी सांगावे घेता येतात की नाही.आस्थापनाचा विषय येत नाही.

मा.महापौर :प्रशासनाने नियमानुसार योग्य ती कार्यवाही करावी.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेत यु.बी.एस.पी.योजनेअंतर्गत विविध कार्यक्रम राबविण्यासाठी श्रीमती राजकुमारी लक्ष्मण गायकवाड व श्रीमती सिंधू कडूबा सुरडकर यांची समुदाय संघटक या पदावर विहित पध्दतीचा अवलंब करुन सन १९९२-९३ मध्ये रु.१२००/- मानधनावर नियुक्ती करण्यात आलेली असून नाशिक व इतर महानगरपालिकेतील सदर योजनेतील कर्मचाऱ्यांना कायमस्वरुपी नियुक्ती देण्यात असल्याने त्याच धर्तीवर समुदाय संघटक या दोन महिला कर्मचाऱ्यांना पूर्वलक्षीप्रभावाने कायमस्वरुपी नियुक्ती देण्याकरीता व प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यासाठी प्रशासनाने नियमानुसार योग्य ती कार्यवाही करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७६:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वॉर्ड क्र.८४ मधील विजय नगर लगत असलेल्या औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रात गट क्र. ५१ मधील आरक्षण क्र. २४४ हे भुखंड हायस्कुल या सदराखाली आरक्षीत आहे. सदरील भुखंड हायस्कुलसाठी राखीव असून ही जागा आपल्या महागरपालिकेने मांगीलाल फुलपगर यांचेकडून संपादित केली आहे. परंतु गेल्या काही वर्षापासून या जागेवर मोठ्या प्रमाणात अतिक्रमण होऊन छोटी मोठी घरे तयार होत आहे. तसेच उर्वरीत जागेवर सुध्दा अतिक्रमण होण्याची शक्यता जास्त आहे.

सद्यस्थितीत महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट आहे तसेच महानगरपालिकेतील शाळेत मुलांची प्रवेशाबाबत अवस्था अत्यंत दयनिय आहे. तसेच विद्यार्थ्यांचा ओढा अत्यल्प आहे. या जागेसाठी आदर्श शिक्षण प्रसारक मंडळ पानवढोद बु. यांचे तसेच गौतम ऋषी शिक्षण संस्था औरंगाबाद यांचे व सत्य साई शिक्षण प्रसारक मंडळ यांचे अर्ज आलेले आहेत. वरील तीन पैकी दोन संस्था ह्या वॉर्डातील नसून त्यांना शासन शाळा मान्यता दिल्यावर त्या आरक्षीत जागेवर शाळा सूरू करणार असे म्हटले आहे. परंतु सदरील ठिकाणी या भागात सत्य साई शिक्षण प्रसारक मंडळा तर्फे शासन मान्य अनुदानित हायस्कुल चालु आहे. त्यांची ती शाळेची इमारत भाडेतत्वावर असून त्यांनी आपल्या महानगरपालिकेकडे आरक्षित जागेची मागणी केली आहे. त्यांना सदरील आरक्षित भुखंड हे भाडेतत्वावर हायस्कुलसाठी देण्यात यावे. जेणे करून महागनरपालिकेला आर्थिक उत्पन्न निर्माण होईल व हायस्कुल साठीचा आरक्षणाचा उद्येश साध्य होईल. करीता हा प्रस्ताव सर्वसाधारण सभेसमोर मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.विजेंद्र मुरलीधर जाधव **अनुमोदक:-** श्री.कृष्णाभाऊ सांडुजी बनकर

मा.महापौर :हा विषय रद्द करण्यात येतो.

**ठराव:-**

प्रस्तुत प्रस्ताव रद्द करण्यास मंजुरी देण्यात आली.

<u>ऐनवेळचे विषय</u>

**विषय क्रमांक ७७७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, शासन निर्णय दिनांक ०४.०५.२००६ नुसार औरंगाबाद महानगरपालिकेसाठी उपसंचालक नगर रचना हे पद मंजुर आहे. दिनांक ०१.०९.२०१४ च्या शासन निर्णयानुसार औरंगाबाद महानगरपालिकेची वर्गवारी आता “ड” वर्गातुन “क” वर्गामध्ये करण्यात आली आहे. दिनांक ०३.११.२०१२ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेतर्फे उपसंचालक नगर रचना या पदावर शासनातर्फे सक्षम अधिकारी प्रतिनियुक्तीने सत्वर पाठविण्याकरता विनंती करण्यात आली होती, तथापी अद्याप पर्यंत अधिकारी पाठविण्यात आलेला नाही. औरंगाबाद महानगरपालिकेचा कामाचा व्याप पाहता व झपाटयाने वाढणारे शहर पाहता उपसंचालक नगर रचना हे पद भरणे आवश्यक आहे.

त्यामुळे दि.०४.०५.२००६ च्या शासन निर्णयानुसार औरंगाबाद महानगरपालिकेसाठी असलेल्या मंजुर उपसंचालक नगर रचना या रिक्त पदावर महानगरपालिका आस्थापनेवरील एकमेव अधिकारी श्री.डॉ.डी.पी.कुलकर्णी, सहाय्यक संचालक नगर रचना, शासनाने ठरवलेली आवश्यक शैक्षणीक अर्हता व अनुभव पुर्ण करत असल्याने त्यांची या पदावर नियुक्ती करणे योग्य राहील. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.राजु रामराव शिंदे, श्री.मिर हिदायत अली मिर बसालत अली.

**अनुमोदक:-** श्री.रवि साहेबराव कावडे, संजय रामदास जोशी.

**संवाद :**

मा.महापौर :ऐनवेळचे विषय आहे नगरसेवकांनी मांडलेला विषय आहे.

श्री.मधुकर सावंत :नगर सचिव यांना ऐनवेळचे विषय वाचून दाखवायला लावावे.

श्री.हुशारसिंग चव्हाण :ऐनवेळचे विषय क्रमांकासह वाचून दाखवावे.

यावेळी अनेक स.सदस्य डायस समोर एकाच वेळी बोलत असतात.

मा.महापौर :ठराव मंजुर करण्यात येते.

श्री.हुशारसिंग चव्हाण :ऐनवेळचा विषय काय आहे. शेवटचा विषय क्रमांक काय आहे वाचून दाखवावे. नगर सचिव यांनी ऐनवेळचे विषय वाचून दाखवावे.

श्री.मधूकर सावंत :ऐनवेळचे विषय वाचून दाखवा. संचालक पदाबाबत कोर्टात प्रकरण मा.न्यायालयाने आदेश आहे. त्यांना शासनाकडे पाठविले. हा विषय वाचून दाखवा. मा.उच्च न्यायालयाचे आदेश आहे. हा विषय वाचून दाखवा. मा. उच्च न्यायालयाचे आदेश आहे. हा कोर्टाचा अवमान आहे.

श्री.खाजा शरफोद्दीन :हा विषय घेणार तर कोर्टाचा अवमान आहे.

श्री.जुबेर गाझी :कोर्टाचे या संदर्भात आदेश आहे.

यावेळी स.सदस्य मोठमोठ्याने बोलत असतात.

मा.महापौर :प्रशासनाचा ठराव व नगरसेवकांचे ठराव हे ऐनवेळचे विषय मंजुर करण्यात येते.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे दिनांक ०४.०५.२००६ च्या शासन निर्णयानुसार औरंगाबाद महानगरपालिकेसाठी असलेल्या मंजुर उपसंचालक नगर रचना या रिक्त पदावर महानगरपालिका आस्थापनेवरील एकमेव अधिकारी श्री.डॉ.डी.पी.कुलकर्णी, सहाय्यक संचालक नगर रचना, शासनाने ठरवलेली आवश्यक शैक्षणीक अर्हता व अनुभव पुर्ण करत असल्याने श्री.डॉ.डी.पी.कुलकर्णी यांची औरंगाबाद महानगरपालिकेच्या उपसंचालक नगररचना या पदावर नियुक्ती करणेस मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७८:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.७०, विद्यानगर अंतर्गत अलंकार सोसायटी येथे महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या सभागृहास या भागातील ज्येष्ठ नागरिक व समाजसेवक रामचंद्रजी शर्मा यांचे नाव देण्यात यावे असे या भागातील नागरिकांची मागणी आहे.

तसेच विद्यानगर येथे महानगरपालिकेमार्फत विकसित करण्यात आलेल्या उद्यानास “मातोश्री उद्यान” असे नाव देण्यात यावे, अशी या परिसरातील नागरीकांची मागणी आहे.

करीता वार्ड क्र.७०, विद्यानगर अंतर्गत अलंकार सोसायटी येथे महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या सभागृहास “कै.रामचंद्रजी शर्मा सभागृह” तसेच येथील उद्यानास “मातोश्री उद्यान” असे नाव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.किशोर बाबुराव नागरे. **अनुमोदक:-** श्री.विरभद्र रामलिंग गादगे.

मा.महापौर :- ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र.७०, विद्यानगर अंतर्गत अलंकार सोसायटी येथे महानगरपालिकेमार्फत बांधण्यात आलेल्या सभागृहास “कै.रामचंद्रजी शर्मा सभागृह” असे नाव देण्यास तसेच विद्यानगर येथे महानगरपालिकेमार्फत विकसित करण्यात आलेल्या उद्यानास “मातोश्री उद्यान” असे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७७९:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात खालील कामांची तरतुद करण्यात आलेली आहे. सदरील कामांना मंजुरी होऊन निवीदाही मंजुर झालेल्या आहेत. कामाचा कार्यादेश देणे बाकी आहे. परंतु त्या त्या ठिकाणी त्या त्या कामाची आवश्यकता नसल्यामुळे ती कामे रद्द करून त्याऐवजी खालील प्रमाणे स्थळ बदल करण्यात यावा.

| अ क्र | अंदाजपत्रकातील अ.क्र. मुळ काम | रक्कम | अ.क्र | सुधारित काम | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | वॉर्ड ई-स्पील पेज नं.१०३ अ.क्र. २ वर व्यापारी संकुल व इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत स्वप्न नगरी येथील खुली जागा विकसीत करणे. वॉर्ड ई-स्पील पेज नं.१०३ | १४ लाख | ०१ | बाळकृष्ण नगर येथे विविध ठिकाणी रस्ते दूरूस्त करणे | १४ लाख |
| ०२ | अ.क्र.२ वर व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखाशिर्ष अंतर्गत स्वप्ननगरी येथील खुल्या जागेवर हॉल बांधणे | १५ लाख | ०२ | बाळकृष्ण नगर येथे विविध ठिकाणी विद्युत पोल विद्युत दिवे बसविणे, वायरिंग करणे. | १५ लाख |
| ०३ | वॉर्ड क्र.७० स्वप्ननगरी खुल्या जागेत संरक्षित भींत बांधणे वॉर्ड ई-स्पील पेज नं.-१०५ अ.क्र.८ | १७ लाख | ०३ | भुषण नगर व कल्पतरु सो. येथे ड्रेनेज लाईन व रस्ते दुरूस्ती करणे | १७ लाख |
| ०४ | वॉर्ड क्र. ७० अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसवून रस्त्यांची दुरूस्ती करणे. वॉर्ड ई-स्पील पेज नं.९२ अ.क्र.१९ | ०५ लाख | ०४ | गुरूदत्त नगर येथे विविध ठिकाणी फिटींग बसविणे व हायमास्ट बसविणे | ५ लाख |
| ०५ | वॉर्ड क्र. ७० राणा नगर येथील रस्त्याच्या बाजुस पेव्हर पाथवे तयार करणे वॉर्ड ई-स्पील पेज नं.१०२ अ.क्र.६२ | १२ लाख | ०५ | दुर्गा हा.सो.व विजय नगर येथे रस्ते दूरूस्ती करणे | १२ लाख |
| ०६ | वॉर्ड क्र. ७० अलंकार सो. तसेच परिमल/कल्पतरु सो.अंतर्गत रस्त्यावर पेव्हरपाथवे तयार करणे. वॉर्ड ई-स्पील पेज नं.१०२ अ.क्र.६५ | १० लाख | ०६ | साईनगर गजाननगर येथे विविध ठिकाणी रस्ते दूरूस्त करणे | १० लाख |

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.किशोर बाबुराव नागरे,

**अनुमोदक:-** श्री.प्रफुल्ल लालचंद मालाणी,श्री.संजय सांडु चौधरी

मा.महापौर :- ऐनवेळीचा विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात खालील कामाची तरतुद सुधारीत कामासाठी वळती करण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ क्र | अंदाजपत्रकातील अ.क्र. मुळ काम | रक्कम | अ.क्र | सुधारित काम | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | वॉर्ड ई-स्पील पेज नं.१०३ अ.क्र. २ वर व्यापारी संकुल व इमारती या लेखाशिर्षा अंतर्गत स्वप्न नगरी येथील खुली जागा विकसीत करणे. वॉर्ड ई-स्पील पेज नं.१०३ | १४ लाख | ०१ | बाळकृष्ण नगर येथे विविध ठिकाणी रस्ते दूरूस्त करणे | १४ लाख |
| ०२ | अ.क्र.२ वर व्यापारी संकुल व इतर इमारती या लेखाशिर्ष अंतर्गत स्वप्ननगरी येथील खुल्या जागेवर हॉल बांधणे | १५ लाख | ०२ | बाळकृष्ण नगर येथे विविध ठिकाणी विद्युत पोल विद्युत दिवे बसविणे, वायरिंग करणे. | १५ लाख |
| ०३ | वॉर्ड क्र.७० स्वप्ननगरी खुल्या जागेत संरक्षित भींत बांधणे वॉर्ड ई-स्पील पेज नं.-१०५ अ.क्र.८ | १७ लाख | ०३ | भुषण नगर व कल्पतरु सो. येथे ड्रेनेज लाईन व रस्ते दुरूस्ती करणे | १७ लाख |
| ०४ | वॉर्ड क्र. ७० अंतर्गत रस्त्यावर पेव्हर ब्लॉक बसवून रस्त्यांची दुरूस्ती करणे. वॉर्ड ई-स्पील पेज नं.९२ अ.क्र.१९ | ०५ लाख | ०४ | गुरूदत्त नगर येथे विविध ठिकाणी फिटींग बसविणे व हायमास्ट बसविणे | ५ लाख |
| ०५ | वॉर्ड क्र. ७० राणा नगर येथील रस्त्याच्या बाजुस पेव्हर पाथवे तयार करणे वॉर्ड ई-स्पील पेज नं.१०२ अ.क्र.६२ | १२ लाख | ०५ | दुर्गा हा.सो.व विजय नगर येथे रस्ते दूरूस्ती करणे | १२ लाख |
| ०६ | वॉर्ड क्र. ७० अलंकार सो. तसेच परिमल/कल्पतरु सो.अंतर्गत रस्त्यावर पेव्हरपाथवे तयार करणे. वॉर्ड ई-स्पील पेज नं.१०२ अ.क्र.६५ | १० लाख | ०६ | साईनगर गजाननगर येथे विविध ठिकाणी रस्ते दूरूस्त करणे | १० लाख |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७८०:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, विजयनगर गारखेडा येथे शाळेसाठी महापालिकेच्या मालकीची जागा आरक्षित आहे. तथापि या ठिकाणी शाळा नसल्यामुळे या भागातील गोरगरिबांच्या मुलांची गैरसोय होत आहे. खाजगी शाळेतील शिक्षकांचा खर्च त्यांना परवडत नसल्यामुळे चांगल्या शिक्षणाच्या दर्जापासून ते वंचित राहतात. या भागातील मुलांना शिक्षणाची सोय व्हावी या दृष्टिने सदर ठिकाणी शाळा सुरू करणे आवश्यक असल्याबाबत या भागातील

नागरीकांची मागणी आहे. नागरीकांनी केलेली मागणी विचारात घेता या भागात शाळा बांधण्यात यावी.

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.किशोर बाबुराव नागरे, **अनुमोदक:-** श्री.विरभद्र रामलिंग गादगे

मा.महापौर : ऐनवेळचा विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे विजय नगर गारखेडा येथे शाळेसाठी मनपाच्या मालकीची आरक्षित जागा असून या भागातील मुलांना शिक्षणाची सोय व्हावी या दृष्टीने सदर ठिकाणी शाळेचे बांधकाम करण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८१:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, किलेअर्क व्ही.आय.पी.रोड येथे बांधण्यात येत असलेले सभागृहाला बौध्दवासी सुधाकर गोविंदराव भुईगळ (ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते) यांचे नाव देण्यात यावे.

करीता प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेत मंजुरीस्तव सादर.

**सुचक:-** श्री.विजेंद्र मुरलीधर जाधव,

**अनुमोदक:-** डॉ.खान जफर अहेमद,श्रीमती ज्योती रुपचंद वाघमारे

मा.महापौर :- ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे किलेअर्क व्ही.आय.पी.रोड येथे बांधण्यात येत असलेले सभागृहाला बौध्दवासी सुधाकर गोविंदराव भुईगळ (ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते)यांचे नाव देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८२:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, लेखाशिर्ष बदला बाबतचा खालील प्रस्ताव सर्वसाधारण सभेत ठेवण्यात यावा ही नम्र विनंती.

| अ.क्र | अंदाजपत्रकातील अ.क्र. मुळ काम | रक्कम | अ.क्र | सुधारित काम | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात पान क्र. जी.बी.आर. बी-४ अ.क्र.५ वर वॉर्ड क्रमांक १६ भागात विविध ठिकाणी डांबरीकरण करणे | ३० लाख | १ | वॉर्ड क्र.१६ येथे विविध भागात कॉंक्रीटीकरण करणे. | १५ लाख |

करीता प्रस्ताव सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक:-** श्री.किशोर बाबुराव नागरे, **अनुमोदक:-** श्री. विरभद्र रामलिंग गादगे.

मा.महापौर :- ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खालील लेखाशिर्ष बदलण्यास मंजुरी देण्यात येते.

| अ.क्र | अंदाजपत्रकातील अ.क्र. मुळ काम | रक्कम | अ .क्र | सुधारित काम | रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | २०१४-१५ च्या अर्थसंकल्पात पान क्र. जी.बी.आर. बी-४ अ.क्र.५ वर वॉर्ड क्रमांक १६ | ३० लाख | १ | वॉर्ड क्र.१६ येथे विविध भागात कॉंक्रीटीकरण करणे. | १५ लाख |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | भागात विविध ठिकाणी डांबरीकरण करणे | | | | |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७८३:-</u>**

आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद पाणी पुरवठा योजने अंतर्गत औरंगाबाद शहरापासून उत्तरेस ५ किमी अंतरावर खाम नदीवर धरण बांधण्यात आलेले आहे. या धरणाचे बांधकाम तत्कालीन निजाम सरकारने सन १९५६ मध्ये पुर्ण केलेले आहे. या धरणाची एकूण साठवण क्षमता ६.७९ दशलक्ष घनमीटर इतकी असून उपयुक्त पाणी साठविण्याची क्षमता ६.११ दशलक्ष घनमीटर इतकी आहे. धरणाचे पाणलोट क्षेत्र हे ६५ चौरस किलो मीटर इतके असून धरणाचे बुडीत क्षेत्र हे १३७.५९ हेक्टर इतके आहे. धरणाची पुर्ण संचय पातळी ही २८ फुट आहे.

या धरणातील पाण्याचा उपयोग शहरवासियांना व्हावा याकरीता धरणापासून साधारणतः १ किलोमीटर अंतरावर १० द.ल.ली. प्रती दिन क्षमतेचे जलशुध्दीकरण केंद्र सन १९५६ मध्ये कार्यान्वीत करण्यात आलेले आहे. या तलावातून सन १९५६ पासून शहरास प्रतिदिन १० दलली इतका पाणी पुरवठा केला जातो. शहरास पाणी पुरवठा करण्यासाठी दगडी बांधकामामध्ये उद्‌भव विहिर (Jackwell), विहिरीत विविध पातळ्यांवर तीन ठिकाणी झडपा बसविण्यात आलेल्या असून या झडपांद्वारे अशुध्द पाणी पाईप लाईनच्या सहाय्याने धरणाच्या भिंतीच्या बाहेर असलेल्या हौदापर्यंत आणले जाते. हौदापासून जलशुध्दीकरण केंद्रापर्यंत असलेल्या ४५० मी.मी. व्यासाच्या आर.सी.सी. जलवाहिनीद्वारे पाणी आणले जाते. जलशुध्दीकरण केंद्र येथे पाण्यावर प्रक्रिया करुन ४५० मीमी व्यासाच्या आर.सी.सी. जलवाहिनीद्वारे शुध्द पाण्याचा पुरवठा दिल्लीगेट जलकुंभास केला जातो. हर्सुल तलाव शहरापासून उंचावर असल्याने हर्सुल तलाव ते जलशुध्दीकरण केंद्र व जलशुध्दीकरण केंद्र ते दिल्लीगेट जलकुंभ या दरम्यान असलेली जलवाहिनी ही गुरुत्व पध्दतीने कार्य करते. या योजनेकरीता विद्युत शक्तीची आवश्यकता नसल्याने पाणी उत्पादनाचा खर्च हा जायकवाडी योजनेच्या तुलनेत अत्यल्प आहे. सद्यस्थितीतही हर्सुल उद्‌भवावरुन शहराच्या काही भागात जसे लोटा कारंजा, हर्ष नगर, लेबर कॉलनी, गणेश कॉलनी, बुढ्ढी लेन, आरेफ कॉलनी, अशंतः घाटी परिसर, हीना नगर, रशिदपुरा इत्यादी भागात दिल्लीगेट जलकुंभावरुन पाणी पुरवठा केला जातो. सद्यस्थितीत हर्सुल जलशुध्दीकरण केंद्र येथून दररोज ४.५ ते ५ द.ल.ली पाणी परिमाण शहराकरीता उपलब्ध होत आहे.

कमी पर्जन्यमानामुळे मागील काही वर्षांपासून हर्सुल तलावात पाणीसाठा न झाल्याने शहराचा पाणी पुरवठा पुर्णपणे जायकवाडी उद्‌भवावर अवलंबून होता. सन २०१२-१३ या वर्षी हर्सुल धरण पुर्णपणे आटल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत हर्सुल तलावातील गाळ काही प्रमाणात काढण्यात आलेला आहे. सन २०१३-१४ या वर्षी हर्सुल तलावात २१ फुट इतकी पाणी पातळी झाली होती. सन २०१४-१५ या वर्षी पुरेसे पर्जन्यमान न झाल्याने हर्सुल तलावात नव्याने पाणीसाठा होऊ शकला नाही. तथापि सन २०१२-१३ या वर्षी काढण्यात आलेला गाळ तसेच सन २०१३-१४ या वर्षी तलावातील पाणीसाठा यामुळे हर्सुल तलावातून सद्यस्थितीतून पाणी पुरवठा होत आहे. दिनांक २७.०२.२०१५ रोजी हर्सुल तलावात ३ फुट इतका पाणीसाठा शिल्लक असून पुढील १५ दिवसांकरीता या उपलब्ध पाणी साठ्यातून वर नमुद केलेल्या भागांना पाणी पुरवठा करता येणे शक्य आहे.

सद्या हर्सुल तलावामध्ये जरी ३ फुट इतका पाणीसाठा शिल्लक असला तरीही सदर साठा पाणी पुरवठा होत असलेल्या विहिरीपासून वेगवेगळ्या ठिकाणी साचलेला आहे. त्यामुळे

तात्पुरत्या स्वरुपात चारी खोदून विहिरीपर्यंत पाणी आणण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. आगामी एक ते दीड महिन्यात धरणातील पाणी संपुष्ठात येवून संपुर्ण धरण आटणार आहे. साधारणतः जुलै २०१५ मध्ये पर्जन्यमान होऊन धरणात पाणी येण्यास सुरुवात होईल, असे गृहीत धरता दरम्यानचा एप्रिल ते जून या कालावधीत हर्सुल तलावातील गाळ काढता येणे शक्य आहे. सद्यस्थितीत शहराचा पाणी पुरवठा जायकवाडी उद्‌भवावर अवलंबून असला तरीही हर्सुल तलावातून मिळणारे ५ ते ६ द.ल.ली पाणी जायकवाडी योजनेवरील भार कमी करण्यास उपयुक्त ठरते. त्याचप्रमाणे हर्सुल उद्‌भवावरुन असलेली पाणी पुरवठा योजना ही गुरुत्व पध्दतीवर आधारीत असून पाणी उत्पादनाचा खर्च हा अत्यल्प असल्याने या उद्‌भवातून पुरेसा पाणी पुरवठा होणे गरजेचे आहे. हर्सुल धरणात नव्याने पाणीसाठा होण्यास ५ महिन्याचा कालावधी असल्याने तसेच धरण पुर्णपणे कोरडे होणार असल्याने धरणातील काही प्रमाणात गाळ काढून धरणाची क्षमता वाढविण्याकरीता योग्य परिस्थिती निर्माण झालेली आहे.

मा.जिल्हाधिकारी,औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.२०१३/मशाका-२/मुसनि/कावि-११६५ दिनांक १४ जून २०१३ अन्वये मुख्यमंत्री सहायता निधी (दुष्काळ २०१३) अंतर्गत हर्सुल तलावातील गाळ काढण्यासाठी रक्कम रुपये २ कोटी औरंगाबाद महानगरपालिकेला देण्यात आले आहेत. तथापि त्यावेळी पावसाळा असल्याने हर्सुल तलावातील गाळ काढण्याचे काम हाती घेता आले नाही. प्रकरणी पावसाळा संपल्यानंतर प्राप्त निधी संदर्भाने हाती घ्यावयाच्या कामाबाबत कार्यवाही करण्यात येईल असे महानगरपालिकेचे पत्र जा.क्र.मनपा/२२२/२०१३ दिनांक ०९.१०.२०१३ नुसार मा. जिल्हाधिकारी यांना पत्राद्वारे कळविण्यात आले आहे.

प्रकरणी प्राप्त परिस्थिती लक्षात घेता व धरण पुर्णपणे कोरडे होणार असल्याने धरणातील गाळ काढण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २०१३-१४ च्या दरसुचीनुसार रुपये १,९८,७६,३२२/- किंमतीचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. या कामा अंतर्गत साधारणतः १६,२५० चौरस मीटर भागामधील ४७,१२० घनमीटर इतका गाळ काढण्याचे प्रस्तावित आहे. हे काम केल्यानंतर धरणातील पाणीसाठा निश्चितच वाढणार आहे. या संदर्भाने वैधानिक कार्यवाही केल्यानंतर उपरोक्त प्रमाणे काम करुन घेणे योग्य राहील.

करीता उपरोक्तप्रमाणे रुपये १,९८,७६,३२२/- किंमतीचे अंदाजपत्रक मा. सर्वसाधारण सभेसमोर विचारार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :- ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद पाणीपुरवठा योजनेअंतर्गत असलेल्या हर्सुल धरणातील गाळ काढणेसाठी मा.जिल्हाधिकारी औरंगाबाद यांचे पत्र जा.क्र.२०१३/मशाका-२/मुसनि/कावि-११६५ दिनांक १४ जून २०१३ अन्वये मुख्यमंत्री सहायता निधी (दुष्काळ २०१३) अंतर्गत रक्कम रुपये २ कोटी औरंगाबाद महानगरपालिकेला प्राप्त झाले असून धरणाची सद्यस्थिती लक्षात घेता व धरण पुर्णपणे कोरडे होणार असल्याने धरणातील गाळ काढण्यासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण मंडळाच्या सन २०१३-१४ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेल्या रुपये १,९८,७६,३२२/- किंमतीच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८४:-**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहे की, औरंगाबाद महानगरपालिकेने महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम ४५८ च्या पोट कलम (२) अन्वये औरंगाबाद महानगरपालिका पाणी पुरवठा आणि पाणपट्टी उपविधी - २०११ तयार केले असून

त्या उपविधीस दिनांक ०६.०२.२०१४ रोजी महाराष्ट्र शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे. ही उपविधी औरंगाबाद महानगरपालिका क्षेत्रासाठी लागु करण्यात आलेली आहे. उपविधीतील तरतुदींनुसार अनाधिकृत नळ जोडणी अधिकृत करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत स्थानिक वर्तमानपत्रात जाहीर प्रगटन देऊन दिनांक ०१.११.२०१४ ते ३०.०१.२०१५ या कालावधीमध्ये अभय योजना राबविण्यात आलेली आहे. तथापि या अभय योजनेस नागरीकांचा अल्प प्रतिसाद मिळाल्याने आणि शहराची वाढती लोकसंख्या, कमी पडणारे पाणी परिमाण व उन्हाळ्याचे दिवस लक्षात घेता अनाधिकृत नळ जोडण्यांवर अंकुश बसावा याकरीता राबविण्यात आलेल्या अभय योजनेस दिनांक ३०.०६.२०१५ पर्यंत मुदतवाढ मिळण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर. तसेच यामुदतीनंतर शहरातील अनाधिकृत नळ जोडण्या धारकांविरुध्द उपविधीतील तरतुदींनुसार कार्यवाही प्रस्तावीत करण्यात येईल.

करीता प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभे समोर मान्यतेस्तव सादर.

मा.महापौर :- ऐनवेळीचा विषय मंजुर. नियमानुसार कार्यवाही करावी.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे औरंगाबाद महानगरपालिकेच्या मंजुर उपविधीतील तरतुदींनुसार अनाधिकृत नळ जोडणी अधिकृत करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत दिनांक ०१.११.२०१४ ते ३०.०१.२०१५ या कालावधीमधील अभय योजनेस नागरीकांचा अल्प प्रतिसाद मिळाल्याने आणि शहराची वाढती लोकसंख्या, कमी पडणारे पाणी परिमाण व उन्हाळ्याचे दिवस लक्षात घेता अनाधिकृत नळ जोडण्यांवर अंकुश बसावा याकरीता राबविण्यात आलेल्या अभय योजनेस दिनांक ३०.०६.२०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७८५:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मराठवाडा मुक्ती संग्रहालयाचा हॉल उभारणीसाठी मा.खासदार श्री राजकुमार धुत यांनी त्यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम सन २०१२-१३ मधुन रुपये १,९७,२८,०३७/- चा निधी दिलेला आहे. या कामाच्या अंदाजपत्रकास मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्रमांक ४७९ दिनांक २९.०९.२०११ नुसार मान्यता दिलेली आहे. त्यानंतर कामाच्या निविदा मागविल्या असता प्राप्त निविदामधील सर्वात कमी दराची मे. ड्रिमलॅड कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.१०% कमी दराच्या निविदेस मा.स्थायी समिती सभेने ठराव क्रमांक ५३७ दिनांक २०.१२.२०११ अन्वये मान्यता दिलेली आहे. या कामात फक्त संग्रहालयाच्या स्थापत्य कामाचा समावेश असून, काम प्रगतीपथावर आहे.

दिनांक ०८.०१.२०१५ रोजी मा.पालकमंत्री ना.श्री रामदास कदम, मा.खासदार श्री चंद्रकांत खैरे, मा.महापौर, मनपा पदाधिकारी, जिल्हाधिकारी, औरंगाबाद तसेच पोलीस आयुक्त, औरंगाबाद यांचेसमवेत जायमोक्यावर कामाची पाहणी केली. या पाहणीच्या वेळी मा.ना.श्री रामदास कदम यांनी कामे तातडीने पुर्ण करणे बाबत आदेशीत करुन, या कामासाठी जिल्हा वार्षीक योजनेतुन निधी वितरीत करण्यात येईल असे आश्वासन दिले.

मा.पालकमंत्री ना.श्री रामदास कदम यांनी दिलेल्या आदेशानुसार अंतर्गत सजावटीचे, संग्रहालयाच्या विद्युत विकास कामाचे आणि उर्वरीत स्थापत्य कामाचे अंदाजपत्रक जिल्हाधिकारी यांना सादर करण्यात आले. त्यास जिल्हाधिकारी यांनी मान्यता दिलेली आहे. संग्रहालयाच्या कामासाठी खालील प्रमाणे मान्यता प्राप्त आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | संग्रहालयाची अंतर्गत सजावट | ४,७८,४१,३३७.०० |
| २. | लॅड स्केपिंग | ५२,०७,२०६.०० |
| ३. | रस्त्याचे काम | २८,९५,९२७.०० |

| | | |
|---|---|---|
| ४. | स्थापत्य व विद्युत विषयक काम | २३,१७,१७५.०० |
| ५. | Audio vision आणि डॉक्युमेन्ट्री | ८,५०,०००.०० |
| ६. | वास्तु विशारद फि | ८,८६,६७५.०० |
| | एकुण | ५,९९,९८,३२०.०० |

मा.पालकमंत्री, मा.महापौर यांनी कामाचे उद्घाटन दिनांक ०१.०२.२०१५ रोजी करण्याच्या दृष्टीने कामे पुर्ण करण्यात यावी असे आदेशीत केले. त्यामुळे उर्वरीत कामाचे निविदा काढणे व इतर अनुषंगीक कामे करणे याकरीता अपुरा वेळ असल्यामुळे मा.महापौर यांनी संग्रहालयाचे काम करीत असलेले उपलब्ध ठेकेदार यांचेकडुन उर्वरीत कामे करुन घेणे बाबत आदेशीत केले. त्यानुसार स्थापत्य कामाचे ठेकेदार ड्रिमलॅड कन्स्ट्रक्शन यांच्या कडुन उर्वरीत कामे सुरु केलेली आहे.

आता मुळ संग्रहालयाच्या कामात खालील प्रमाणे वाढ होत आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | संग्रहालयाचे स्थापत्य काम | १,९७,२८,०३७.०० |
| २. | स्थापत्य कामांतर्गत Extra Item | १६,७१,५२२.०० |
| ३. | संपुर्ण विद्यूत विषयक कामे. | ३०,९०,४७७.०० |
| | **एकुण** | **२,४४,९०,०३६.००** |

करीता कामाच्या रक्कम रुपये २,४४,९०,०३६/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास आणि वाढीव काम मुळ कामाचे ठेकेदार ड्रिमलॅड यांच्याकडुन त्यांच्या मुळ मान्यताप्राप्त निविदा दराप्रमाणे म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.१०% कमीने करुन घेण्यास मान्यता होणेबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :- ऐनवेळीचा विषय मंजुर.

**<u>ठराव:-</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मराठवाडा मुक्ती संग्रहालयाचा हॉल उभारणीचे कामात होत असलेल्या वाढीव कामास व वाढीव कामाचे रक्कम रुपये २,४४,९०,०३६/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास आणि वाढीव काम मुळ कामाचे ठेकेदार मे. ड्रिमलॅड कन्स्ट्रक्शन यांच्या कडुन मुळ मान्यता प्राप्त निविदा दराप्रमाणे म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.१०% कमीने करुन घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७८६:-</u>**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मराठवाडा मुक्ती संग्रहालयाचे काम सिध्दार्थ उद्यानात प्रगतीपथावर आहे. या कामासाठी अर्थसंकल्प सन २०१४-१५ मध्ये रक्कम रुपये ५.८० कोटीची तरतुद आहे. या तरतुदीमधुन संग्रहालयाच्या इमारती सभोवती लॅन्ड स्कॅपींगचे काम करण्यासाठी रक्कम रुपये ५५,३९,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा.सर्वसाधारण सभेने ठराव क्रमांक ६३० दिनांक ११.०८.२०१४ नुसार मान्यता दिलेली आहे. त्यानंतर कामाच्या निविदा मागविल्या असता प्राप्त निविदामधील सर्वात कमी दराची मे. ए.एस.कन्स्ट्रक्शन यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९५% जास्त दराच्या निविदेस मा.स्थायी समिती सभेने ठराव क्रमांक ५४ दिनांक २६.०८.२०१४ अन्वये मान्यता दिलेली आहे.

दिनांक ०८.०१.२०१५ रोजी मा.पालकमंत्री ना.श्री रामदास कदम, मा.खासदार श्री चंद्रकांत खैरे, मा.महापौर व मनपाच्या पदाधिकाऱ्यांनी जायमोक्यावर कामाची पाहणी करुन कामे तातडीने पुर्ण करण्याचे आदेश दिले. संग्रहालयाच्या बाकी असलेल्या कामाचा आढावा घेतला असता मा.खासदार श्री चंद्रकांत खैरे यांनी सुशोभीकरण व संग्रहालयाच्या संरक्षीत भिंतीच्या कामासाठी रुपये २५.०० लक्षचा निधी दिला. त्यास मा.जिल्हाधिकारी यांनी दिनांक ०८.०१.२०१५ रोजी प्रशासकीय मान्यता दिली आहे.

वरील पाहणीच्या वेळी मा.पालकमंत्री ना.श्री रामदास कदम, मा.खासदार श्री चंद्रकांत खैरे यांनी प्राप्त होणाऱ्या खासदार निधीतून उर्वरीत लॅन्ड स्कॅपींगची कामे त्वरीत संग्रहालयाचे काम करणारे कंत्राटदार मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्याबाबत आदेशीत केले.

मा.खासदार श्री चंद्रकांत खैरे यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम २०१४-१५ अंतर्गत प्राप्त रुपये २४.९८ लाखाचे कामाचे आणि मुळ लॅन्ड स्कॅपींग कामाचे एकुण रक्कम रुपये ८०,४८,३००/- (५५,३९,७०० + २४,९८,६००) च्या सुधारीत अंदाजपत्रकास आणि वाढीव काम मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास मान्यता होणेबाबतचा प्रस्ताव मा.सर्वसाधारण सभेच्या विचारार्थ तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :- ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मा.खासदार यांच्या स्थानिक विकास कार्यक्रम २०१४-१५ अंतर्गत प्राप्त रुपये २४.९८ लाखाचे कामाचे आणि मुळ लॅन्ड स्कॅपींग कामाचे एकुण रक्कम रुपये ८०,४८,३००/- (५५,३९,७०० + २४,९८,६००) च्या सुधारीत अंदाजपत्रकास आणि वाढीव काम मे.ए.एस.कन्स्ट्रक्शन यांच्याकडुन अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्रमांक ७८७:-**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिका वार्ड क्र.७० (विद्यानगर) भागातील छत्रपतीनगर येथील देवगिरी अपार्टमेंटच्या बाजुला असलेल्या खुल्या जागेवर नागरीक कचरा टाकतात त्यामुळे तेथे नेहमी कुत्रे आणि डुकरांचा वावर असतो तो कचरा उडुन आमच्या कंपाऊड मध्ये येतो व नेहमी दुर्गंधी सुटते त्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होतो आणि खुली जागा असल्याने तेथे नेहमी वाळुच्या ट्रक व बस उभ्या राहतात तसेच त्या ठिकाणी अवैध कृत्य केली जातात. त्यामुळे महिला व नागरीकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होतो.

करिता वरिल जागेवर महानगरपालिकेने कुंपण भिंत बांधून तेथे खुले रंगमंच, व्यायाम शाळा, बांधून विकसीत करावे किंवा तेथील रहीवासी यांच्या स्वखर्चाने कुंपन भिंत बांधून खुले रंगमंच व व्यायाम शाळा इत्यादी बांधण्यास व त्याचा त्यांना वापर करण्यास महानगरपालिकेने परवानगी देण्यासाठी प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभेच्या मान्यतेस्तव सादर.

**सुचक :** श्री. सुर्यकांत जायभाये **अनुमोदक :** श्री.प्रफुल्ल मालाणी

मा.महापौर : ऐनवेळचा विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महानगरपालिका वार्ड क्र.७० (विद्यानगर) भागातील छत्रपतीनगर येथील देवगिरी अपार्टमेंटच्या बाजुला असलेली खुल्या जागेवर महानगरपालिकेने कुंपण भिंत बांधून तेथे खुले रंगमंच, व्यायाम शाळा, बांधून विकसीत करण्यास किंवा तेथील रहीवासी यांच्या स्वखर्चाने कुंपनभिंत बांधून खुले रंगमंच व व्यायाम शाळा इत्यादी बांधण्यास व त्याचा त्यांना वापर करण्यास परवानगी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्रमांक ७८८:-</u>**

आयुक्त, महानगरपालिका औरंगाबाद प्रस्ताव सादर करीत आहेत की, औरंगाबाद महानगरपालिका शहराची समांतर जलवाहिनी योजना पीपीपी तत्वावर राबवित आहे. समांतर जलवाहिनीच्या रुपये ३५९.६७ कोटी किंमतीच्या प्रकल्पास केंद्र शासनाच्या Urban Infrastructure Development Scheme for Small & Medium Towns (UIDSSMT) या योजनेतुन मान्यता झालेली आहे. औरंगाबाद महानगरपालिकेची आर्थिक स्थिती पाहता औरंगाबाद महानगरपालिका ही योजना पीपीपी तत्वावर राबवित आहे. पीपीपी योजने अंतर्गत मुळ मंजुर प्रस्तावा पेक्षा शहरामध्ये कन्झ्युमर मीटर्स बसविणे तसेच शहरा अंतर्गत वितरण व्यवस्थेत १२८९ किमी लांबीच्या वितरण वाहिन्या टाकणे व नविन जलकुंभ बांधणे इत्यादी कारणांमुळे पीपीपी योजनेची किंमत सन २००८-०९ च्या दरसुचीनुसार रुपये ७९२.२० कोटी झाली आहे.

मुळ मंजुर रुपये ३५९.६७ कोटी रकमेच्या DPR मध्ये वितरण व्यवस्थे करीता DI पाईपची मान्यता असल्याने पी.पी.पी. योजने अंतर्गत DI पाईप गृहीत धरुन अंदाजपत्रक केलेले आहे. सध्या आधुनीक तंत्र ज्ञानाने विकसीत High Density Poly Ethelene (HDPE) पाईपचा वापर इतर शहरांमध्ये पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेकरीता सुरु झालेला असून या पाईपच्या वापरामुळे गळत्यांचे प्रमाण लक्षणिय रित्या कमी होऊ शकते. त्यामुळे निविदा अटी व शर्ती नुसार वितरण व्यवस्थेमध्ये DI पाईप ऐवजी Combination of HDPE + DI पाईप वापरण्यास 'केंद्र व राज्य शासनाकडुन आवश्यक ती मान्यता प्राप्त करणे, अशा बदलामुळे महानगरपालिकेस कोणताही आर्थिक भार सोसावा न लागणे, विकासकाने द्यावयाच्या सेवा सुविधांचा स्तर हा Service Level Requirment नुसार असणे आणि शासनाने अशा बदलास मान्यता न दिल्यास वितरण व्यवस्थेत फक्त DI पाईप वापरणे' अशा अटींवर निविदा कार्यवाही करतांना RFP निविदेच्या वेळेस निविदा भरण्याच्या आधी सर्व निविदाधारकांना मुभा देण्यात आलेली आहे. RFP निविदा कार्यवाही करतांना पात्र निविदाधारकांनी उपरोक्त बाब गृहित धरुन निविदा कार्यवाही केलेली आहे व या बाबी गृहित धरुनच सर्विस लेव्हल पॅरामीटर्स अंतिम करण्यात आले आहेत.

दिनांक २२.०९.२०११ रोजी औरंगाबाद महानगरपालिकेने औरंगाबाद सिटी वॉटर युटिलिटी कंपनी लिमीटेड (कन्सेशनर) यांचे सोबत कन्सेशन ॲग्रीमेंट केलेले असून दिनांक ०१.०९.२०१४ रोजी सर्व वैधानिक कार्यवाही अंती पाणी पुरवठा योजना औरंगाबाद महानगरपालिकेने कन्सेशनरकडे हस्तांतरीत केली आहे.

सद्यस्थितीत कन्सेशनर मार्फत योजनेचे संचलन व देखभाल दुरुस्तीचे काम सुरु असून प्रकल्पाच्या नविन भांडवली कामांकरीता डीपीआर तयार करण्याचे काम अंतिम स्थितीत आहे.
सद्यस्थितीत मुळ मंजुर प्रकल्पा नुसार व योजनेची किंमत काढतांना फक्त DI पाईप गृहित धरलेले असल्याने योजनेची कामे करतांना फक्त DI पाईप वापरावेत असा मुद्दा समोर येत आहे. तथापि निविदा कार्यवाही दरम्यान सर्व निविदाधारकांना निविदा भरण्यापूर्वी DI पाईप ऐवजी Combination of HDPE + DI पाईप वापरण्यास common platform म्हणून मुभा देण्यात आलेली होती. त्यानुसार निविदाधारकांनी निविदा भरलेल्या आहेत. तसेच DI पाईप ऐवजी Combination of HDPE + DI पाईपचा वापर करुन सर्विस लेव्हल पॅरामीटर्स अंतिम केले आहेत. त्यामुळे आज रोजी प्रकल्पांतर्गत केवळ DI पाईपचा वापर करण्यास कन्सेशनर यांना सक्ती करता येणार नाही असे इकडील मत आहे.

त्यामुळे निविदा अटी व शर्ती नुसार वितरण व्यवस्थेमध्ये DI पाईप ऐवजी Combination of HDPE + DI पाईप वापरण्यास केंद्र व राज्य शासनाकडुन आवश्यक ती मान्यता प्राप्त करण्याची जबाबदारी कन्सेशनर यांची आहे. जर भविष्यामध्ये या संदर्भाने शासनाने वितरण व्यवस्थेमध्ये DI पाईप ऐवजी Combination of HDPE + DI पाईप वापरण्यास परवानगी दिली तर कन्सेशनरला त्या मंजुरी प्रमाणे कार्यवाही करता येईल. अन्यथा वितरण व्यवस्थेमध्ये पूर्णत: DI पाईपचाच वापर करण्यात येईल. याबाबीस प्रकल्पाकरीता कन्सेशनरची नियुक्ती करतांना ठराव क्र. २१३ दिनांक २२.०३.२०११ रोजी स्थायी समिती सभेने मान्यता दिलेली आहे.

त्यामुळे निविदा अटी व शर्तीनुसार शासन मान्यतेच्या अधिन राहून वितरण व्यवस्थेमध्ये DI पाईप ऐवजी Combination of HDPE + DI पाईप वापरण्यास कन्सेशनर यांना परवानगी देणे योग्य राहील. करीता प्रस्ताव मा. सर्वसाधारण सभे समोर माहीतीस्तव तथा मंजुरीस्तव सादर.

मा.महापौर :ऐनवेळीचा विषय मंजुर.

**ठराव:-**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे निविदेतील अटी व शर्ती नुसार शासन मान्यतेच्या अधिन राहून वितरण व्यवस्थेमध्ये DI पाईप ऐवजी Combination of HDPE (High Density Poly Ethelene) + DI (Ductile Iron) पाईप वापरण्यास परवानगी देण्यात येते. तथापि अशा परवानगीमुळे महानगरपालिकेस कोणताही आर्थिक भार सोसावा लागु नये, विकासकाने द्यावयाच्या सेवा सुविधांचा स्तर हा Service Level Requirment नुसार असावा आणि शासनाने Combination of HDPE + DI पाईप वापरण्यास मान्यता न दिल्यास वितरण व्यवस्थेत फक्त DI पाईप वापरावे लागतील या अटीवर HDPE + DI पाईपचे combination समांतर जलवाहीनीच्या पीपीपी प्रकल्पात प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे वापरण्यास मान्यता देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगिताने सभा संपल्याचे मा.महापौर यांनी घोषित केले.

नगर सचिव
महानगरपालिका औरंगाबाद.